# कोर्ट विद्यमान उपविभागीय अधिकारी, चंद्रपूर

रा.मा.क्र. ९३/एन.ए.पी-३६/२००७-०८

मौजा- दे.गो.रै. ता. चंद्रपूर जिल्हा चंद्रपूर

**आदेश**

**( पारीत दिनांक ०५/०४/२००८ )**

मौजा-दे.गो.रै. येथील **सर्व्हे** नंबर ९६/५ मधील आराजी ०.६७ हे. आर पैकी आवेदकाच्या ताब्यातील ५१७.२०२ चौ. मिटर जागेवरील निवास वापराखालील असलेला अनाधिकृत अकृषक वापर सौ. सुषमा शंकरराव राजुरकर रा. चंद्रपूर यांनी अर्ज सादर केल्यावरुन प्रकरण पंजीबध्द करण्यात आले. प्रकरणातील कागदपत्रावरुन खालील बाबी स्पष्ट होतात.

तलाठी साझा क्रमांक ११ दुर्गापूर यांचे प्रतिवेदन दिनांक ०१/१०/२००५ अन्वये प्राप्त करण्यात आले. मौजा-दे.गो.रै. येथील सर्व्हे नंबर ९६/५ मधील आराजी ०.६७ हे. आर पैकी आवेदकाच्या ताब्यातील ५१७.२०२ चौ. मिटर जागा सौ. सुषमा शंकरराव राजुरकर रा. चंद्रपूर यांचे मालकीची असून त्यांचे नावाची नोंद गांव नमुना ७/१२ मध्ये दर्ज आहे. अर्जदाराने मौक्यावर अनाधिकृतपणे वापर सन २००२-२००३ पासुन केल्याचे प्रतिवेदनात नमुद केले आहे. अर्जदाराचे अनाधिकृत मुखंडाला नियमानुकूल करण्यास हरकत नसल्याचे कळविले आहे.

सदर प्रकरणांत नगर रचनाकार चंद्रपूर यांनी त्यांचे पत्र जा. क्रमांक अ.अ.वा./ /दे.गो.रै./मौजा दे.गो.रै./स.क्र.९६/५/ नरच /४३५ दिनांक ०३/०४/२००८ अन्वये सदर जागा प्रारुप सुधारीत योजनेच्या तरतुदीनुसार उक्त जागेमध्ये निवासी वापर अनुज्ञेय असल्यामुळे निवासी प्रयोजनार्थ अनाधिकृत अकृषक निवासी वापर नियमानुकूल करण्याची शिफारस केलेली आहे. या प्रकरणांत सुध्दा तोच सर्व्हे नंबर असल्यामुळे नाहरकत प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यास हरकत वाटत नाही.

वरील सर्व बाबींचा विचार करता अर्जदाराने केलेला अनाधिकृत अकृषक वापर निवास प्रयोजनार्थ नियमानुकूल करण्यास नगर रचनाकार चंद्रपूर यांनी शिफारस केलेली आहे तसेच अनधिकृत जागेचा वापर हा बिना परवानगीने केल्यामुळे ते दंडास पात्र आहे. म्हणून महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ४५ व ४७(२) अन्वये मौजा-दे.गो.रै. येथील सर्व्हे नंबर ९६/५ मधील आराजी ०.६७ हे. आर पैकी आवेदकाच्या ताब्यातील ५१७.२०२ चौ. मिटर जागेवरील सौ. सुषमा शंकरराव राजुरकर रा. चंद्रपूर यांना खालील अटी व शर्तीवर अनाधिकृत अकृषक वापर निवासाकरीता नियमानुकूल करण्याचे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## अटी व शर्ती

१. सदर जमिनीचा निवास प्रयोजनासाठी अकृषक आकारणी प्रति चौरस मिटर ०.५६ पैसे अकृषक दराने एकूण ५१७.२०२ चौ. मिटर ला रुपये २९०/- अकृषक सारा दर वर्षी भरणा करावा लागेल.

२. उक्त जागेचा वापर अर्जदारांनी मागील २००२-०३ वर्षापासुन केला असून एकूण ५ वर्षांचा अकृषक सारा रुपये ०.५६ पैसे प्रमाणे २९० X ६ = १४५० रुपये एकमुस्त शासन जमा करावा लागेल.

३. वार्षीक सा-याचे ५ पट येणारी रक्कम परावर्तीत कर १७२ X ५ = १४५०

४. अनाधिकृत अकृषक वापर केल्यामुळे वार्षीक सा-याचे १० पट दंड म्हणून रुपये २९००/- एकमुस्त शासन जमा करावे.

५. सदर जमीनीचा अकृषक वापर फक्त निवास प्रयोजनार्थ करण्यांत यावा. अकृषक प्रयोजनात बदल केल्यास दंडात्मक कार्यवाही करुन अकृषक आकरणी करण्यात येईल.

६. सदर जागेचा सक्षम प्राधिका-यांचे पुर्व परवानगीशिवाय विभाजन करण्यांत येवून नये. तालुका निरीक्षक भुमी अभिलेख यांचेकडून उपरोक्त जागेची मोजणी करुन हद्द निशान्या कायम कराव्यात.

७. बांधकाम करण्यापूर्वी बांधकामाची रितसर परवानगी नगर परिषद चंद्रपुर (स्थानीक प्राधीकरण) यांचेकडून घेण्यात यावी.

८. उक्त जागेवरील वापर नियमानुकूल केल्यामुळे आजुबाजूचे लोकांचे सुविधाधिकार बाधीत होता कामा नये.

९. वरील अटी व शर्तीचा भंग झाल्यास सदर आदेश रद्द करण्यात येईल

सही/-
उपविभागीय अधिकारी,
चंद्रपूर

प्रतिलिपी :- १) तहसिलदार, चंद्रपूर
२) तलाठी साझा क्रमांक ११ दुर्गापुर यांना माहीती तथा आवश्यक कार्यवाहीस अग्रेषीत
३) अर्जदार सौ. सुषमा शंकरराव राजुरकर रा. चंद्रपूर यांना माहीती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषीत.

उपविभागीय अधिकारी,
चंद्रपूर